CMYK

काम बोलता है..! म्हणून मेहकर-लोणार मतदारसंघाचा कल महायुतीकडे! >> पान 2

भाजपने महाराष्ट्राच्या राजकारणात विष पसरवलं ; संजय राऊत यांची भाजपवर जहर टीका >> पान 3

मद्यधुंद ट्रकचालकाचा तब्बल १६ किलोमीटर महामार्गावर थरार >> पान 4


**सुविचार**

त्याग हा सर्व प्रकारच्या कलेचा बिंदूच आहे. – महात्मा गांधी


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034


कमल हासनच्या वाढदिवसाला मणिरत्नम यांची मौल्यावान भेट आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 90 ■ शुक्रवार, दि. 08 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## लाडक्या बहिणींना पैसेच पैसे, महायुती २१००, मविआ ३००० तर वंचित देणार ३५०० रुपये, कोणी नेमके काय आश्वासन दिले?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना प्रचाराच्या केंद्रस्थानी आहे. आम्हाला महिलांच्या समस्या ठावूक आहेत. त्यामुळेच आम्ही महिलांना प्रतिमहिना १५०० रुपये देण्याचे ठरवले, असा दावा सत्ताधारी करत आहेत. आम्ही सत्तेत आल्यास या आर्थिक मदतीत वाढ करू असं आश्वासनही महायुतीने दिलं आहे. दरम्यान, आता महिला मतदारांचे महत्त्व ओळखून विरोधी बाकावरील महाविकास आघाडी तसेच वंचित बहुजन आघाडीनेदेखील महिलांना मोठ्या आर्थिक मदतीचे आश्वासने दिले आहे.



महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांनी तसेच प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्त्वातील वंचित बहुजन आघाडी या पक्षाने राज्यातील महिलांना प्रतिमहिना भरघोस आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. राज्यात महिला मतदारांचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळेच महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांकडून ही आश्वासनं दिली जात आहेत.

सत्ताधारी महायुती सरकारने जुलै महिन्यात या योजनेला सुरुवात केली. ऑगस्ट महिन्यापासून राज्यातील पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळण्यास सुरवात झालेली आहे. नोव्हेंबर महिन्यातील आचारसंहिता लक्षात घेता महायुतीने महिलांना ऑक्टोबर महिन्यातच नोव्हेंबर महिन्याचे पैसे दिले आहेत. तर दुसरीकडे विरोधकांकडून ही योजना जास्त काळ टिकणार नाही, असा दावा केला जात आहे. महिला मतदारांना लाडकी बहीण योजनेच्या पैशांतून आकर्षित करण्यात येत आहे, असा दावा विरोधकांकडून केला जात आहे.

महाविकास आघाडीने लाडकी बहीण योजनेद्वारे मिळणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या या योजनेच्या माध्यमातून महिलांना प्रतिमहिना १५०० रुपये दिले जातात. आम्ही सत्तेत आल्यास ही रक्कम २१०० रुपयांपर्यत वाढवली जाईल, असे महायुतीने म्हटलेय. तर लाडकी बहीण योजनेला पर्याय म्हणून विरोधकांनी महालक्ष्मी योजना आणली आहे. आम्ही सत्तेत आल्यास ही योजना लागू करू. तसेच या योजनेच्या माध्यमातून महिलांना प्रतिमहिना ३००० रुपयांची मदत करू, असे महाविकास आघाडीने आश्वासन दिलेले आहे. महिला मतदारांचे महत्त्व ओळखून वंचित बहुजन आघाडीनेदेखील महिलांना आर्थिक मदतीचे आश्वासन दिलेले आहे. आम्ही सत्तेत आल्यास महिलांना प्रतिमहा ३५०० रुपये देऊ, असे वंचितने म्हटलेय.

त्यामुळे महिला नेमके कोणाच्या पारड्यात मते टाकणार? आणि सत्तेत आल्यास दिलेल्या आश्वासनांप्रमाणे महिलांना आर्थिक मदत मिळणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## २६ नोव्हेंबरला 'मृदगंध पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन!

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई / प्रतिनिधी:** मिहाराष्ट्राला लोकसंस्कृतीचा मोठा वारसा लाभला आहे. त्यातीलच एक महत्त्वाचे नाव म्हणजे महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप. महाराष्ट्राचा पहाडी आवाज असं बिरुद मिळालेले लोकशाहीर विठ्ठल उमप आज आपल्यात नसले तरी त्यांची आठवण आल्यावाचून राहत नाही. विठ्ठल उमप आज आपल्यात नाहीत, पण त्यांची गाणी, नाटकं व आठवणी आजही मराठी रसिक मनावर रुंजी घालत आहेत. लोकशाहीर, लोकगायक, गीतकार, असं बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या संगीत नाटक अकादमी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शाहीर विठ्ठल उमप यांच्या १४ व्या स्मृतीदिनानिमित्त १४ वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोह व विठ्ठल उमप फाऊंडेशनचा 'मृदगंध पुरस्कार' वितरणाचा भव्य सोहळा पार पडणार आहे. विठ्ठल उमप फाऊंडेशनतर्फे आयोजित होणारा 'मृदगंध पुरस्कार' सोहळा येत्या २६ नोव्हेंबरला संपन्न होणार आहे.

सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना 'मृदगंध पुरस्कार' देण्यात येतो. हा पुरस्कार विशेष मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येतो. यावर्षी पुरस्कार प्राप्त नामवंत मंडळी कोण असतील? याची उत्सुकता सगळ्यांनाच आहे. त्याविषयीची घोषणा विठ्ठल उमप फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. नंदेश विठ्ठल उमप शनिवार ९ नोव्हेंबरला एका पत्रकार परिषदेत करणार आहेत.

## ४ वर्ष जुना मेल सापडेल एक झटक्यात, तुम्हाला हे लिहून करावे लागेल सर्च

**मुंबई / प्रतिनिधी:** अनेक वेळा जुने फोटो किंवा कागदपत्रे असलेले जुने मेल आवश्यक असतात. अशा परिस्थितीत हजारो मेलमधून ३-४ वर्षे जुन्या मेल्स काढणे अवघड होऊन बसते. स्क्रोल करण्याशिवाय काहीही उरत नाही, परंतु आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही, येथे आम्ही तुम्हाला सांगू की तुम्ही क्षणार्धात जुने मेल कसे शोधू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या मेल्स सेक्शनच्या सर्च बारमध्ये हे लिहून सर्च करावे लागेल. यानंतर तुमच्या समोर सर्व मेल्स असतील.

जुने मेल शोधण्यासाठी तुम्हाला जास्त काही करावे लागणार नाही, तुम्हाला फक्त उस्रग्त उघडावे लागेल. जीमेल उघडल्यानंतर सर्च बारमध्ये जा, सर्च बारमध्ये 'द्त्ीूरह:४ङ' टाइप करा, यानंतर तुमच्या समोर ४ वर्षे जुने मेल उघडतील, तुम्हाला हवे असलेले मेल उघडता येतील.

त्याचप्रमाणे, जर तुम्हाला तीन, पाच किंवा त्याहून जुने मेल शोधायचे असतील तर तुम्हाला ते सहज सापडेल, त्यानंतर तुम्हाला तासन्तास बसून स्क्रोल करावे लागणार नाही.

## अजित पवार मर्द माणूस, दिलेला शब्द पाळतो... अजितदादा प्रचार करणार समजताच नवाब मलिकांकडून तोंडभरून कौतुक!

**पुणे / प्रतिनिधी:** विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचे नेते नवाब मलिक यांना महायुतीने विरोध केला असला तरी देखील राष्ट्रवादीने पाठिंबा दिला आहेत. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी नवाब मलिक यांनी पाठिंबा दिला असून ते मलिकांचा प्रचार देखील करणार आहेत. नवाब मलिक काही महिन्यांपूर्वी तुरुंगात होते. त्याआधी भाजपने त्यांच्यावर गंभीर आरोप देखील केले होते. भाजपाने आम्ही नवाब मलिक यांचा प्रचार करणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. महायुतीतील भाजपचा विरोध झुगारून आपल्याला उमेदवारी दिली आणि आता प्रचारात देखील उतरणार आहे याबाबत बोलताना मलिकांनी अजित पवारांचं कौतुक करत दिलेला शब्द दादा पाळतात असं म्हटलं आहे.



अजित पवार हा मर्द माणूस आहेत. ते जो शब्द देतात तो शब्द दादा पाळतात. आमच्या कठीण काळात पाठीशी ते उभे राहिले आणि आम्हाला उमेदवारी देखील दिली. आता महायुती आणि महाविकास आघाडी माझ्या विरोधात आहे. मात्र, जनता माझ्यासोबत आहे, असंही पुढे नवाब मलिक यांनी म्हटलं आहे.

## उद्धव ठाकरेंची घरात बसून कारभार करायची सवय सुटली नाही; चंद्रशेखर बावनकुळेंची खोचक टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** अडीच वर्षे घरात बसून फेसबुक लाईव्ह करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आज 'मातोश्री'त बसून उबाठा गटाचा वचननामा प्रकाशित केला. अडीच वर्षे फक्त 'माझं कुटुंब माझी जबाबदारी' म्हणत स्वतःच्या कुटुंबापुरतं राजकारण केलं. आताही घरात बसून कारभार करायची सवय सुटली नाही, अशी खोचक टीका भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे.



उद्धवजी नेता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो

बावनुकळे यांनी म्हटलं आहे की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आतापर्यंत प्रत्येक वचननामा शिवसेना भवनात प्रकाशित केला. कारण त्यांच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचं हित होतं. पण सच्चा शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या डोळ्यासमोर फक्त आणि फक्त कुटुंबचं आहे. उद्धवजी नेता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो.

उद्धव ठाकरे यांनी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. महाविकास आघाडीची जाहीर सभा यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले. मतदान कोणाला आणि का द्यायचे, कोणत्या विचारसरणीला मतदान करायचे हेही महत्त्वाचे आहे. आम्ही बुधवारी महाविकास आघाडीच्या ५ हमीबद्दल सांगितले होते. आज (७ नोव्हेंबर) आम्ही आमचा जाहीरनामा प्रसिद्ध करत आहोत. या जाहीरनाम्यात, आम्ही नमूद केलेल्या ५ हमींमध्ये आम्ही आणखी काही योजना जोडत आहोत. आम्ही लवकरच महाविकास आघाडीचा तपशीलवार जाहीरनामा देखील लॉन्च करू, असे त्यांनी सांगितले.

धारावीतून संपूर्ण मुंबई गिळंकृत करण्याचा डाव असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. हे षड्यंत्र थांबवायचे आहे. मुंबईतील हजारो एकर जमीन अदानीला देण्यात आली आहे. आमचे सरकार आल्यानंतर आम्ही ही निविदा रद्द करू. धारावीत नवीन वित्त केंद्र बांधणार आहोत. महाराष्ट्राच्या सुपुत्रांसाठी नोकऱ्यांची व्यवस्था करू. आम्ही मुलांबरोबरच मुलींनाही मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करू. आम्ही फक्त तेच वचन देतो जे आम्ही पूर्ण करु शकतो.

## भाजप राहुल गांधींना घाबरले आहे नाना पटोले यांची भाजपवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर / प्रतिनिधी :** भाजपचा १५ लाखाचा जुमला, दोन कोटी तरुणांना नोकऱ्या देणार याची आठवण करून द्यायची का ? आम्ही वचन देतो आम्ही दिलेले शब्द पाळलेला आहे, लोकसभेत पराभव झाल्यामुळे भाजपला लाडक्या बहिणी आठवल्या, आम्ही लाडकी पण योजना बंद करणार नाही तर त्यात वाढवून देणार आहे. त्यामुळे भाजपच्या पायाखालची वाळू सरकली आहे. अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजप वर केली. ते दि.७ नोव्हेंबर रोजी प्रसारमाध्यमासमोर बोलत होते.



यावेळी वणी येथे घडलेल्या प्रकाराबाबत भाजप बाबत म्हणाले की, वणीमध्ये केंद्रातील माजी मंत्री आहेत. आणि वणीचे आमदार यांच्यासमोर कुणबी समाजाला ज्या पद्धतीने भाजपच्या लोकांनी शिवा घातल्या, कुणबी कुत्र्याची जात आहे. अशा पद्धतीने शेतकऱ्यांचा अपमान काल केला, त्या भाजपला हाच शेतकरी आज धडा शिकवणार आहे.भाजप शेतकरी विरोधी असताना त्यांच्या जातीला शिव्या घालत आहे. देवेंद्र फडणवीस तुम्ही ज्या मतदारसंघात निवडणूक लढत आहे.तिथे कुणबी समाज आहे, भाजप नेत्यांनी कुणबी समाजाला शिव्या घातल्या आहेत. त्याची जाहीर माफी देवेंद्र फडणवीस व पंतप्रधान मोदींनी मागितली पाहिजे ही काँग्रेसची भूमिका आहे.

तर भाजप जवळ जाहिरातीसाठी भ्रष्टाचाराचा कमावलेल्या पैसा आहे, महाराष्ट्रात ६७ हजार महिला गायब झाल्या आहेत, अत्याचार झाले त्याबद्दल सरकार माहिती देत नाही,अत्याचार करणाऱ्यांवर कारवाई होत नाही, कोर्टाला सुमोटो कारवाई करावी लागते, भाजपचे लोक महिलांबद्दल काय बोलतात त्यामुळे त्यांना महिलांबद्दल बोलण्याचा अधिकार त्यांना नाही. तर राज ठाकरे भोंगे बंद करू ची भाषा करतात.त्यांना संविधानिक व्यवस्थेची कल्पना नाही, स्वतः राज्यकर्ते आहोत, आमचा सातबारा लिहिलेला असे वागत असतात, त्या व्यवस्थेबद्दल नाही बोललं तर बरं आहे, अशा लोकांबद्दल मी प्रतिक्रिया देणार नसल्याचे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले.तर भाजप राहुल गांधींना घाबरलेला आहे, राहुल गांधींनी जी भूमिका मांडली.त्यामुळे कुठल्या ना कुठल्या परिस्थितीत अडवण्याचा भाजप प्रयत्न करत आहे. राहुल गांधी देशाच्या जनतेचा आवाज म्हणून भूमिका मांडत आहे ते भाजपला मान्य नाही, लोकसभेचा अधिवेशन आहे. त्यामध्ये मोदी सरकार अडचणीत येणार आहे, त्यामुळे खोट्या केसेस राहुल गांधींना अडकवण्याचा प्रयत्न भाजप सरकार करत आहे, पण त्यांच्या केसालाही धक्का लावला तर भाजपच्या सरकारला पळो की सळो केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोल यांनी दिला.

### पवार यांच्याशी चर्चा

शरद पवार आणि मी आज एकाच ठिकाणी थांबलो होतो, ते विदर्भात दौऱ्यात आहेत, मी मराठवाड्याच्या दौऱ्यावर चाललो आहे. राजकीय भूमिकांवर त्यांच्याशी चर्चा झाली आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.




## आज शिवसेनेची लोणार येथे तोफ धडाडणार

### लोणार येथे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा

दैनिक आपला विदर्भ

**लोणार / प्रतिनिधी :** शिवसेना उमेदवार सिद्धार्थ खरात यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लोणार. मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात शिवसेनेचा उमेदवार विजयी करण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांची दि.८ नोहेंबर रोजी दुपारी ३ वाजता ग्रँड विश्र्वनाथ मंगल कार्यालय लोणी नाका चौक लोणार येथे शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारासाठी भव्य सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला मतदार संघातील मतदारांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सभेचे आयोजक, महाविकास आघाडीचे पदाधिकारी तथा शिवसेना उबाठाचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे. मेहकर लोणार मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांना तसेच शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे मानणारा प्रचंड मोठा मतदार वर्ग



आहे. या मतदारांच्या बळावरच मेहकर लोणार मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहत आला आहे. यावेळेस शिवसेनेचा उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आणावा, मतदारसंघाच्या विकासाला गती मिळावी यासाठी उच्च विद्याविभूषित व सर्वांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेले सिद्धार्थ खरात यांना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवारी देण्यात आली आहे सोबत महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते असल्याने महाविकास आघाडीचा उमेदवार सिद्धार्थ खरात हे प्रचंड मताने विजय करण्यासाठी मतदारसंघात प्रचार प्रसार केला जात आहे. महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचा उमेदवार सिद्धार्थ खरात यांना यांच्या प्रचारासाठी शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे हे लोणी चौक लोणार येथे दि.८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता भव्य सभा घेणार आहेत. यावेळी ते जनतेला संबोधित करणार आहेत. सभेची जय्यत तयारी केली जात असून मतदारसंघातील मतदारांनाही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सभेला येण्याची उत्सुकता निर्माण झाली आहे.तरी मेहकर लोणार मतदार संघातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांनी प्रचंड संख्येने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सभेला उपस्थित राहावे असे आव्हान महाविकास आघाडीचे पदाधिकारी आयोजक तथा उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे...

CMYK

## फिर एक बार 'ट्रम्प सरकार'

जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या ६० व्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी चे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी अनपेक्षितपणे विजय मिळवला. अनेपेक्षित या अर्थाने म्हणतो की या निवडणुकीत त्यांच्या प्रतिस्पर्धी डेमॉक्रटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांनाही विजयाचे दावेदार समजले जात होते. या निवडणुकीत दोघांच्यातही जोरदार रस्सीखेच होती. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात दोन्ही उमेदवारात काटे की टक्कर दाखवण्यात आलो होती. दोन्ही उमेदवारांची जिंकण्याची शक्यता पन्नास पन्नास टक्के व्यक्त करण्यात आली होती. जो जिंकून येईल तो अगदी काट्यावर निवडून येईल असे मानले जात होते त्यामुळेच ट्रम्प इतक्या घवघवीत मतांनी जिंकून येतील असे कोणालाही वाटले नव्हते. ट्रम्प यांनी तब्बल २७७ इलेक्ट्रोल मत मिळवत कमला हॅरिस यांचा दारुण पराभव करत अमेरिकेत फिर एक बार 'ट्रम्प सरकार' आणले. फिर एक बार असे मी म्हणालो कारण २०१६ ते २०२० असे चार वर्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार अमेरिकेत होते. २०२० साली म्हणजे मागील निवडणुकीत त्यांचा ज्यो बायडेन यांनी दारुण पराभव केला होता. यावेळी मात्र त्यांनी त्या पराभवाचे पुरेपूर उट्टे काढले आणि अमेरिकेवर पुन्हा एकदा स्वतःचे वर्चस्व सिद्ध केले. अर्थात त्यांचा हा विजय का झाला हे देखील तपासून पहावा लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आक्रमक प्रचार करताना अमेरिका फर्स्ट या धोरणाचे जोरदार समर्थन केले. डोनाल्ड ट्रम्प हे कट्टर उजव्या विचारसणीचे आहेत त्यांनी आपल्या प्रचारात हा मुद्दा जोरदारपणे मांडला. आपल्या देशातील समस्यांना अन्य देशातून आलेले स्थलांतरित जबाबदार आहेत. ज्यो बायडेन यांच्या काळात अन्य देशातून अनेक लोक अमेरिकेत आले त्यामुळे अमेरिकेतील स्थानिक नागरिकांचा रोजगार हिरावला गेला असा जोरकस प्रचार त्यांनी केला त्यांचा हाच प्रचार त्यांच्या पथ्यावर पडला आणि तरुणांनी त्यांना भरभरून मते दिली. त्यांनी केलेला आयातीला विरोध आणि आयात उत्पादनावर कर वाढवण्याची केलेली घोषणा ही मतदारांना पटली. अमेरिकने अन्य देशांच्या भांडणात पडण्याची गरज नाही हे त्यांचे मतही जनतेला पटले. तसेच त्यांचा चीन आणि रशियाला असलेला विरोध जगजाहीर आहे. अमेरिकेला मागे सारून चीन जागतिक महासत्ता होऊ पाहत आहे आणि त्यांना रशिया सहाय्य करत असताना ज्यो बायडेन हातावर हात ठेवून बसले आहेत असे चित्र गेली चार वर्ष दिसत होते. चीन आणि रशियाच्या वाढत्या वर्चस्वाला शह द्यायचा असेल तर डोनाल्ड ट्रम्प सारखा आक्रमक नेताच देशाचा राष्ट्राध्यक्ष हवा असे मत अमेरिकन नागरिकांचे बनले त्यात रशिया – युक्रेन आणि इस्राईल – पॅलेस्टाईन युद्धात बायडेन यांनी स्वीकारलेले बोटचेपे धोरण मतदारांना रुचले नाही म्हणूनच अमेरिकन मतदारांनी पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या हाती सत्ता दिली आणि कमला हॅरिस यांना नाकारले. कमला हॅरिस यांनी ट्रम्प यांना जोरदार टक्कर देण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही ज्यो बायडेन यांनी खूप उशिरा त्यांची उमेदवारी घोषित केली त्यामुळे त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. कमला हॅरिस यांचा पराभव हा ज्यो बायडेन यांच्यामुळेच झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ज्यो बायडेन यांची चार वर्षाची कारकीर्द निराशाजनक अशीच होती. अमेरिकेतील सर्वात निष्क्रिय राष्ट्राध्यक्ष अशी अमेरिकेच्या इतिहासात त्यांची नोंद होईल इतकी निराशाजनक कामगिरी त्यांची होती. महागाई, बेरोजगारी, शस्त्र संस्कृती याबाबत त्यांनी दिलेले एकही आश्र्वासन त्यांना पूर्ण करता आले नाही. बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न त्यांना व्यवस्थित हाताळता आला नाही त्यामुळे तरुणांमध्ये त्यांच्या विषयी रोष होता तो त्यांनी मतपेटीतून व्यक्त केला. सगळ्यात महत्वाचे म्हणजे २१ व्या शतकातही अमेरिकेन नागरिक एका कृष्णवर्णीय महिलेला राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वीकारण्यास तयार नाही या आणि यासारख्या अनेक कारणांमुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय सोपा झाला आणि ते पुन्हा एकदा फिर एक बार 'ट्रम्प सरकार' म्हणत सत्तेवर आले.

# काम बोलता है..! म्हणून मेहकर-लोणार मतदारसंघाचा कल महायुतीकडे!

## मतदारसंघातील १ लाख ६ हजार ६६० लाडक्या बहिणींच्या खात्यात ७९,५४,५०,००० जमा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदारसंघाची निवडणूक यंदा एकतर्फी निकालाकडे जातांना दिसत आहे. जी काही लढत व्हायची ती वंचित बहुजन आघाडीच्या डॉ.ऋतुजा चव्हाण आणि विद्यमान आमदार संजय रायमुलकर यांच्यातच होईल असे चित्र आहे. महाविकास आघाडीने प्रचारात उतरण्याआधीच विविध आघाड्यांवर कच खाल्ली आहे, त्यामुळे विद्यमान आ.संजय रायमुलकर हे यंदा किती मतांनी निवडून येतील अशी एकच चर्चा आता गावोगावी होतांना दिसत आहे. आ. रायमुलकर यांनी महायुती सरकारच्या कार्यकाळात आणलेला



हजारो कोटींचा निधी, त्या माध्यमातून





गावागावांत झालेली विकासकामे, शिवाय महायुती सरकारने आणलेल्या लोकोपयोगी योजना या आ.संजय रायमुलकर यांच्या पथ्यावर पडतांना दिसत आहे. एकट्या लाडकी बहीण योजनेचा विचार केला तरी मेहकर लोणार मतदार संघात तब्बल १ लाख ६ हजार ६६० एवढ्या लाडक्या बहिणींच्या खात्यात नोव्हेंबर पर्यंत तब्बल ७९ कोटी ५४ लाख ५० हजार रुपये एवढा निधी जमा झाला आहे...

लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची अतिशय महत्त्वकांक्षी योजना अतिशय लोकप्रिय ठरली आहे. या योजनेच्या माध्यमातून २१ ते ६५ वयोगटातील माय माऊल्यांच्या खात्यात दर महिन्याला १५०० रुपये जमा होतात. आपल्या संसाराचा गाडा ओढण्यासाठी ही मदत बहिणीसाठी अतिशय महत्वाची ठरत आहे. नोव्हेंबर महिन्यापर्यंत प्रत्येक बहिणीच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा झालेले आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणींच्या अनेक कामांना हातभार लागला आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघाच्या प्रचारादरम्यान आ.संजय रायमुलकर यांना गावोगावी महिला भेटतात.. लाडकी बहिण योजनेबद्दल धन्यवाद देतात, चेहऱ्यावरून प्रेमाने हात फिरवतात. लाडक्या बहिणींची ही माया ऊर्जा देणारी आहे, महायुती सरकार असेपर्यंत या योजनेला धक्का लागणार नाही.. असा शब्द आ. रायमुलकर लाडक्या बहिणींना देत आहेत..

# प्रचंड गर्दीच्या सहभागात बालाजी मंदिरात नारळ फोडून महायुतीचा मेहकरात प्रचाराचा शुभारंभ

## भरभरून मतदान करण्याचे रायमुलकर यांचे आवाहन





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना महायुतीचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर यांच्या मेहकर शहरातील निवडणूक प्रचाराचा शुभारंभ शारंगधर बालाजी मंदिरात नारळ फोडून करण्यात आला. शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे आजी–माजी पदाधिकारी व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते .प्रचंड जल्लोषात शहरातील प्रचाराचा आरंभ करण्यात आला लोणार वेस येथील मारुती मंदिरात दर्शन घेऊन व नारळ फोडून रायमुलकर यांनी आशीर्वाद घेतले.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, शहर प्रमुख जयचंद बाठीया, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के, तालुकाप्रमुख कविताताई दांदडे, शहरप्रमुख वैशालीताई सावजी , युवासेनेचे तालुकाअध्यक्ष भूषण घोडे,समाधान साबळे,भाजपचे ऍड शिव ठाकरे, डॉ. सुभाष लोहिया, प्रल्हादअण्णा लष्कर ,ठोकळ महाराज ,पंढरीनाथ देवकर , राजेश निकम , मंदाकिनीताई कंकाळ, ऍड ज्योती अवचार, शिल्पाताई देशमुख, राष्ट्रवादीचे गिरधर पाटील, गजानन सावंत, समीरखान, प्रसिक दुर्योधन यासोबतच शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दिलीपबापू देशमुख, रामराव म्हस्के ,बबनराव भोसले, बबनराव तुपे आणि राजीव मुंदडा ,नितीन राऊत, भागवत भिसे महाराज, रविराज रहाटे ,आशाताई झोरे, मनोज सावजी गायकवाड, अख्तर चुडीवाले ,मनोज जाधव, विनोद देशमुख, समाधान सास्ते, विकास जोशी ,तौफिक कुरेशी, मंगेश तट्टे, संतोष पवार, डॉ.माल, हर्षल गायकवाड, हर्षल कुसळकर,विष्णू खंदारकर भास्कर राऊत ,प्रभाकरराव सपकाळ, भीमशक्तीचे भाई कैलास सुकदाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मारुती मंदिर सभागृहात झालेल्या छोटे खाणी सभेत आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली गत अनेक वर्ष यशस्वीपणे काम केले. मतदार संघाचा विकास केला. यापुढे हीच विकासाची गती कायम ठेवली जाईल. कुठल्याही भूलथापांना बळी न पडता शहरातील नागरिकांनी विकासाचे राजकारण पुढे नेण्यासाठी धनुष्यबाण निशाणीचे बटन दाबून मोठ्या संख्येने मतदान करावे . महायुती एकसंघपणे कार्यरत असल्याने हा विजय आणखी मोठा असेल.

आपल्या भाषणात भाजपचे नेते डॉ सुभाष लोहिया म्हणाले की, इथे महायुतीची प्रचंड हवा असल्याने इतर सर्व उमेदवार निश्र्चितपणे हवेत उडून जातील. आमदार संजय रायमुलकर सर्व गावांमध्ये तगडा संपर्क ठेवून असल्याने व विकास कामे मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे त्यांच्यापुढे कोणीही प्रतिस्पर्धी असला तरी तो निश्र्चितपणाने पराभूत होईल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. गेली तीस वर्ष प्रतापराव जाधव ,संजय रायमुलकर यांनी लोकांशी सतत संपर्क ठेवलेला असून ते अहोरात्र जनतेच्या सेवेत असतात. ज्यांना कोणीच ओळखत नाहीत ,असे बाहेरचे उमेदवार रिंगणात आहेत. हे केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी आले आहेत .त्यामुळे जनता त्यांना भीक घालणार नाही. हिंदुत्ववादी विचाराच्या सर्व घटकांनी संजय रायमुलकर यांच्या धनुष्यबाण निशाणीवर शिक्का मारून त्यांना विक्रमी मतांनी विजय करावे असे आवाहनही डॉ. लोहिया यांनी केले. महायुतीला पोषक वातावरण असून रायमुलकर एक लाखापेक्षा अधिक मताधिक्याने विजय होतील ,असा विश्र्वास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. आशाताई झोरे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

भाई कैलास सुकदाने आपल्या भाषणात म्हणाले की, विरोधातील उमेदवार जेव्हा काँग्रेसच्या मंत्र्याचा उपसचिव होता तेव्हा त्याने दुधाळ जनावरांसाठी अनुदान योजनेचे मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांचे अर्ज नामंजूर केले होते व सिंदखेड राजा तालुक्यातील अर्ज मंजूर केले होते. केवळ पैशाच्या जोरावर निवडणूक लढविण्यासाठी तो उमेदवार आला आहे .परंतु लोक त्याला भीक घालणार नाहीत .कारण प्रतापराव जाधव यांच्या अठरापगड जातींना जिवभावाने सोबत घेऊन विकासाचे राजकारण करण्याच्या परंपरेचे पालन आमदार रायमुलकर करतात. त्यांनी दोन्ही तालुक्याचा प्रचंड विकास केलेला आहे वर्षात लोकांशी मोठा संपर्क निर्माण केलेला आहे, त्यामुळे विरोधी उमेदवाराचे डिपॉझिट जप्त झाल्याशिवाय राहणार नाही.

## राजुरा मतदारसंघात सत्तरीपार आजी-माजी आमदारांत लढत

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** राजुरा मतदारसंघात काँग्रेसचे विद्यमान आमदार सुभाष धोटे व शेतकरी संघटनेचे माजी आमदार ॲड. वाम नराव चटप यांच्यातील लढत रंगतदार होणार आहे. वयाची ७४ व ७३ वर्षे पूर्ण केलेल्या या दोन्ही उमेदवारांची प्रचारात चांगलीच दमछाक होत आहे. त्यांना भाजपातील दोन नाराज माजी आमदार मदत करतात, की पक्षाच्या उमेदवारामागे उभे राहतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

कुणबीबहुल राजुरा मतदारसंघात राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिंपरी या चार तालुक्यांचा समावेश आहे. एकूण १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असले तरी धोटे, चटप आणि भाजपचे देवराव भोंगळे या तिघांमध्येच मुख्य लढत आहे. दिसायला तिरंगी लढत असली तरी प्रत्यक्षात धोटे व ॲड. चटप यांच्यातच तुल्यबळ लढत होण्याची चिन्हे आहे. वयोमानामुळे दोन्ही माजी आमदारांना मतदारसंघातील चार तालुक्यांत तीन लाखांपेक्षा अधिक मतदारांपर्यंत पोहचताना कसरत करावी लागत आहे. विशेष म्हणजे, दोघेही मतदारांसमोर जाताना ही माझी शेवटची निवडणूक आहे, अशी साद घालत आहे.

राजुरा मतदारसंघात सिमेंट कारखाने, कोळसा खाणी व इतर उद्योगांत काम करणारा कामगार वर्ग मोठ्या संख्येत राहतो. उद्योगांतील कामगार मतदारांची प्रत्यक्ष भेट घ्यायची म्हटले तर सकाळी आठ वाजतापासून सायंकाळी आठवाजतापर्यंत पायाला भिंगरी लावून फिरावे लागते. त्यानंतर रात्री दहा वाजेपर्यंत गावांत सभा, स्नेहमि लन कार्यक्रमाच्या निमित्ताने हजेरी लावून प्रचार करावा लागतो. अशा स्थितीतही हे दोन्ही वयोवृद्ध उमेदवार मतदारांपर्यंत पोहचण्याचा पुरेपूर प्रयत्न करताना दिसतात.

# नियमित वीज पुरवठा करण्यासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

## जानेफळ परिसरातील शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा

दैनिक आपला विदर्भ

**जानेफळ/प्रतिनिधी :** रब्बीचा हंगाम सुरू होऊन एक महिना होत असताना पिकांना सिंचनाची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे. मात्र अनियमित वीज पुरवठ्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. वारंवार मागणी करू नही विद्युत वितरण कंपनीकडून दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे त्रस्त झालेल्या जानेफळ व हिवरा खुर्द परिसरातील शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत जाणेफळ येथील वीज वितरण कार्यालयाच्या केंद्रावर धडक दिली. यावेळी शेतकऱ्यांच्या वतीने अधिकाऱ्यांना निवेदन देऊन विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. सदर मागणीची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही दि.७ नोव्हेंबर









रोजी निवेदनाद्वारे देण्यात आला. जानेफळ व हिवरा खुर्द या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीतील विद्युत पुरवठा कायम अनियमित असतो. मिनिटा मिनिटाला लाईट जाते, त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झालेला असून, रात्रत्रात्र लाईट राहत नाही. परिणामी शेतीतील पिकांना पाणी देणे अतिशय दुरापास्त झाले आहे. शेतीतील पिकांना पाणी देता येत नाही तर गावातीलही विद्युत पुरवठा नसतो. शेतीतील व गावठाण मधील रोहित्राची दुरावस्था झाली आहे. त्यांची नियमित देखभाल केली जात नाही. कंत्राटी लाईनमन सेवा देण्यास असमर्थ ठरत आहे.शेतातील व गावातील विद्युत पुरवठा नियमित सुरू राहत नसल्याने शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे. परिणामी शेतात तील विद्युत पुरवठा सुरळीत राहत नसल्याने पिके धोक्यात आली असून महागाचे खते व बी बियाण्याचे खर्च हा व्यर्थ जात आहे. तर पिकाचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत जाणेफळ येथील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देत उपकार्यकारी अभियंता यांना लेखी निवेदन दिले व वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन केल्या जाईल असा इशारा ही दि .७ नोहेंबर रोजी असंख्य शेतकऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर अंकुश दिलीप वानखेडे निंबा, विष्णू यशवंत पवार, माधव दहिभाते, किसन हिवरकर, कैलास किसन उतपुरे, विलास रोडगे, उद्धवराव दळवी,हरिभाऊ तांबे, विलास मनोहर रोडगे गोपाल ढोणे यांच्या प्रतिनिधिक स्वरूपात स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी माधवराव अरसोडे, नामदेवराव काळे, नंदू काळे उपस्थित होते.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून जानेफळ आणि परिसरात सुरू असलेल्या विजेचा हा लपंडाव थांबवावा अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# भाजपने महाराष्ट्राच्या राजकारणात विष पसरवलं

## संजय राऊत यांची भाजपवर जहर टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या राजकारणाला यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, विलासराव देशमुख यांच्यासारख्या महान राजकारण्यांचा वारसा लाभलेली असताना देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणात विष पसरवण्याचे काम करीत आहेत, अशी जहरी टीका शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर दि.७ नोव्हेंबर रोजी केली.

यावेळी ते पुढे म्हणाले की, भाजपने महाराष्ट्राच्या राजकारणात विष पसरवलं आहे. शरद पवार हे देशाचे सर्वोच्च नेते आहेत.नरेंद्र मोदी यांनी बारामतीला जाऊन शरद पवार हे आपले कसे राजकीय गुरु आहेत आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा देश कसा घेत आहे हे वारंवार सांगितले आहे. अत्यंत महत्त्वाची गोष्ट याच बीजेपी सरकारने शरद पवार यांना देशातला भारतरत्न नंतरचा सर्वोच्च नागरिक किताब पद्मविभूषण जो त्यांच्या राजकीय क्षेत्रातील कामाबद्दल सामाजिक, कृषी, शैक्षणिक कामाबद्दल हा किताब त्यांना दिला आहे.तर आपण या राज्यासाठी काय योगदान दिलं याचे आत्मचिंतन देवेंद्र फडणवीस यांच्या बरोबरीने केलं पाहिजे. शरद पवारांसारखा नेता हा राज्यात नाही तर देशाच्या राजकारणातला भीष्मपिता आहे. याचा आम्हाला अभिमान आहे आणि तुम्ही त्यांच्या आजारपणावर अशा प्रकारचा वक्तव्य करून महाराष्ट्राची मान शरमेन खाली घातली आहे. या लायकीची माणसं देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात उभी केली आहेत. - या राज्याला यशवंतराव चव्हाण पासून बाळासाहेब ठाकरे यांच्या पर्यंत विलासराव देशमुख पर्यंत वसंतराव नाईक अशा सर्व महान राजकारणाची परंपरा आहे.त्या तुळशीच्या वृंदावनात ही भांगेची रोपटी देवेंद्र फडणवीस यांनी लावली आणि महाराष्ट्रात वीष पेरण्याचं काम सुरू केले आहे. कधी तो त्यांचा गोपीचंद पडळकर कधी हे खोत कोण आहेत ते तुमचे या राज्यात योगदान काय आहे ? पण तुम्ही आमच्या जे बुलंद नेते आहेत त्यांच्यावर अशा प्रकारची टीका करतात.देवेंद्र फडणवीस यांना लोकंहसतात, महाराष्ट्र देवेंद्र फडणवीस यांचा तिरस्कार करतो, देवेंद्र फडणवीस या व्यक्तीला महाराष्ट्र जवळ नाकारत आहे. हा माणूस महाराष्ट्राचा नाही हा महाराष्ट्राचा शत्रू आहे तो यासाठी तुम्हाला लाज वाटली पाहिजे, हे राज्य सुसंस्कृत संयमी आहे हे संतांचे राज्य आहे, हे चांगलं राजकारणाचे राज्य आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज्य खत्म केलं आहे, म्हणून आम्हाला या राज्याची सत्ता बदलायची आहे. खोत यांचे भाषण किळसवाणे आहे. देवेंद्र फडणवीस यांनी उठून सदाभाऊ खोत यांच्या कानफाटात वाजवली पाहिजे आणि ते फिदी फिदी हसत आहेत. देवेंद्र फडणवीस टाळ्या वाजवत आहे याची लाज वाटली पाहिजे, तुम्ही कधी काळीआमच्या पाठिंबावर या राज्याचे मुख्यमंत्री होतात याचेही जाण ठेवली पाहिजे,

पुन्हा एकदा अर्बन नक्षलाईट मिस्टर देवेंद्र फडणवीस म्हणत आहेत.भारत जोडो यात्रे पठाणकोट पासून जम्मू कश्मीर पर्यंत राहुल गांधी यांच्या सोबत मी देखील झाला होतो आम्ही काही अर्बन नक्षलाईट आहोत का ? - अनेक सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधींसह अनेक पक्षाची लोक या भारत जोडो यात्रेत सहभागी झाले. सामान्य जनता गावागावातून त्या त्या ठिकाणी यात्रा पोहोचल्यावर चालत होती, तुम्ही या जनतेला अर्बन नक्षलाईट समजत आहात.अनेक माजी सैनिक सैन्य अधिकारी यात्रे सहभागी झाले आणि पोलीस अधिकारी आयएएस अधिकारी निवृत्त हे यात्रे सहभागी झाले, तुमच्याबरोबर जे आता इकबाल मिरचीचे सहकारी दाऊद समर्पित राजकारणी ते कोण आहेत आपण जरा आपल्या अवतीभवती कोण बसले आडू-पांडू त्यांच्यावर बोला पहा जरा चष्मा लावा नेट डोळे तपासून घ्या, असा उपरोधिक सल्लाही त्यांनी दिला. जनरल डायर रावसाहेब दानवे आहेत.मग नरेंद्र मोदी कोण आहेत ? मणिपूरला काय चाललं आहे ? जनरल डायर ही पदवी आता बदलायची का ? मणिपूरच्या हिंसाचारावर कोण बोलणार काश्मीरमध्ये आमच्या जवानांची हत्या होत आहे आणि हे आपले ट्रम्प बरोबरचे फोटो प्रसिद्ध करत आहेत. डायर असाच होता आणि याच डायर दानवे तुमचा पराभव केला आहे लोकसभेला विसरू नका, अशी ठिकाणी खासदार संजय राऊत यांनी केली.

### आम्ही संयुक्त पंचसूत्री जाहीर केली

वचननामा आज जाहीर होत आहे, या विषयी स्वतः उद्धव ठाकरे बोलतील, उद्धव ठाकरे दौऱ्याला निघाले आहेत. त्याआधी उद्धव ठाकरे बोलतील, शिवसेनेला ज्या काही महत्त्वाच्या गोष्टी मुंबईसाठी, महाराष्ट्रासाठी करण्याची इच्छा आहे, आम्ही संयुक्त पंचसुत्री जाहीर केली, त्यामध्ये आरोग्य विषयक, महिलांच्या संदर्भात असे अनेक पाच महत्त्वाच्या गोष्टी जाहीर केल्या, त्यांतील शिवसेनेच्या संकल्पनेतला महाराष्ट्राच्या हिता संदर्भातल्या काही योजना त्या संदर्भात उद्धव ठाकरे बोलणार आहेत अशी माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली.



## संक्षिप्त...

### शरद पवारांवर वादग्रस्त वक्तव्य केल्यावर राष्ट्रवादीचा इशारा, सदाभाऊ खोतांनी मागितली माफी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी शरद पवारांबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यानं राज्यात राजकीय वातावरण तापलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सदाभाऊ खोत यांच्या वक्तव्यावर पहिली प्रतिक्रिया दिली.



उपमुख्यमंत्री तथा शरद पवार यांचे पुतणे अजित पवार म्हणाले, ''विरोधकांवर बोलताना पातळी सोडून बोलू नये. आरोप करण्याची पद्धत असते. सदाभाऊंच्या वक्तव्याचा निषेध करत आहोत. त्यांच वक्तव्य अत्यंत निषेधार्ह आहे. खोत यांचे वक्तव्य म्हणजे विनाशकाले विपरीत बुद्धी आहे. वक्तव्य चुकीचं असल्याचं खोत यांना फोनवरून सांगितलं आहे.''

खपवून घेणार नाही-अजित पवार-अजित पवार यांनी एक्स मीडियावर पोस्ट करूनही नाराजी व्यक्त केली. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले,'' ज्येष्ठ नेते आदरणीय पवार साहेब यांच्या विषयी सदाभाऊ खोत यांनी केलेले वक्तव्य हे अत्यंत चुकीचं आणि निंदनीय आहे. अशा पद्धतीनं खालच्या पातळीवर पवार साहेबांवर वैयक्तिक टीका करणं आम्हाला पूर्णपणे अमान्य आहे. ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनं आणि वैयक्तिकरित्या मी या विधानाचा तीव्र शब्दात निषेध करत आहे.'' यापुढे पवार साहेबांवर खालच्या पातळीवर जाऊन कोणी वैयक्तिक टीका केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष खपवून घेणार नाही, अशा इशारादेखील उपमुख्यमंर्त्यांनी दिला.

राष्ट्रवादीचे नेते अमोल मिटकरी यांनी सदाभाऊ खोत यांच्या भाषणाचा व्हिडिओ एक्स मीडियावर पोस्ट करत इशारा दिला. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले, '' बोलणार आणि हसणारे दोघेही लक्षात ठेवत आहोत. कॅन्सरसारख्या जीवघेण्या संकटावर मात करुन पवार साहेबांनी अनेक कॅन्सरग्रस्तांना प्रेरणा दिली.''

राऊतांची टीकाशिवसेनेचे खासदार (उद्धव ठाकरे) संजय राऊत यांनी खोत यांच्या विधानावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. राऊत यांनी म्हटले, ''खोत यांना आधी स्वत:चा चेहरा पाहावा. शरद पवार हे सर्वोच्च नेते आहेत. फडवणीस आणि त्यांची टोळी महाराष्ट्र संपवायला लागला आहे. कानाखाली लावण्याऐवजी फडणवीस हे फिदीफिदी हसत होते. आजारपणावर बोलून महाराष्ट्राची मान शरमेनं खाली गेली. कुणाच्या आजारपणावर बोलण अयोग्य आहे.''

खोत यांनी मागितली माफी-चौफेर टीका होत असताना सदाभाऊ खोत यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, '' माझा कुणाकडे पाहून बोलण्याचा हेतू नव्हता. ही गावगाड्याची भाषा होती. कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो. गावगाड्याची भाषा सम जण्यासाठी मातीत रुजावे लागते. राबावे लागते. मरावे लागते, तेव्हाच भाषा समजते.''

### जम्मू आणि काश्मीर विधानसभेत कलम ३७० वरुन तुफान राडा, सत्ताधारी आणि विरोधक आमदार एकमेकांना भिडले

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला सरकार सत्तेत आले आहे. कलम ३७० वरून निवडणुकीतच वातावरण तापले होते. या मुद्यावर गेल्या दोन दिवसांपासून मोठा वाद सुरू आहे. आज या धुसफुसीचे रुपांतर धक्काबुक्की आणि हाणामारीपर्यंत गेलं आहे. विरोधक आणि सत्ताधारी आमने-सामने आले. कलम ३७० वरून धुमश्चक्री उडाली. हे कलम परत घेण्यासाठी वाद उफाळून आला आहे. दोन्ही गटातील आमदार आज एकमेकांना भिडले.

आज जम्मू आणि काश्मीर विधानसभेत तुफान राडा झाला. आमदारांमध्ये कलम ३७० वर झटापट झाली. यावेळी कलम ३७० रद्द करण्याची मागणी करणारे पोस्टर फाडण्यात आले. विधानसभेचे कामकाज या गोंधळामुळे २० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले होते. मात्र, दोन्ही बाजुचे आमदारांची आक्रमकता पाहता आज विधानसभेच्या काम काजाला जोरदार फटका बसण्याची शक्यता आहे. सकाळी सकाळीच विधानसभेत मोठा हंगामा झाला. त्यानंतर दोन्ही गटाचे आमदार आमने-सामने आल्याने वातावरण तणावपूर्ण झाले. घोषणाबाजीने सभागृह चांगलंच दणाणून गेले.

आज सकाळीच आमदार शेख खुर्शीद कलम ३७० पुन्हा बहाल करण्यात यावे अशी मागणी करणारे पोस्टर घेऊन सभागृहात आले. हे पोस्टर पाहताच भाजप आमदार भडकले. त्यावेळी त्यांनी हे पोस्टर हिसकवण्याचा आणि फाडण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये दोन्ही गटामध्ये झटापट झाली. भाजप आमदारांनी शेख खुर्शीद यांच्या हातातून पोस्टर हिसकावलेच आणि ते फाडले सुद्धा. एकमेकांची कॉलर पकडून बॅनर हिसकावून घेण्यास दोन्ही बाजूंनी सुरुवात केली. गोंधळ वाढत असल्याचे पाहून मध्यस्थी करणाऱ्या मार्शलनी भाजप आमदारांना सभागृहाच्या बाहेर काढले.

### शाहरुख खानसोबत 1000 कोटींची कमाई, तर दीपिका पादुकोणला अजय देवगणसोबत मोठा तोटा!

**मुंबई/प्रतिनिधी** : चित्रपटांमध्ये नफा आणि तोटा दोन्ही सामान्य असतात. तथापि, सेलिब्रेटींच्या इमेजवर त्याचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. 'सिंघम अगेन' मधील अजय देवगणच्या चित्रपटाची कथा मजबूत करण्यासाठी, रोहित शेट्टीने अक्षय कुमार, दीपिका पादुकोण, रणवीर सिंग आणि टायगर श्रॉफ यांचे कॅमिओ देखील जोडले. तथापि, रोहित शेट्टीने कॅमिओमध्येही सर्व स्टार्सना भरपूर जागा दिली आहे. पण 'सिंघम अगेन' मधून ज्याचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे, ती दुसरी कोणी नसून शक्ती शेट्टी म्हणजेच दीपिका पादुकोण आहे.

### कमल हासनच्या वाढदिवसाला मणिरत्नम यांची मौल्यावान भेट, रिलीज तारखेसह 'ठग लाईफ'चा टिझर लॉन्च

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय सिनेमाचा उलगनायगन कमल हासन आज आपला ७० वा वाढदिवस साजरा करत आहे. त्याला शुभेच्छा देण्यासाठी दक्षिणेतील प्रतिभावान दिग्दर्शक मणिरत्नम यांच्या 'ठग लाईफ' या चित्रपटाचा टिझर आज लॉन्च करण्यात आला. या बहुप्रतीक्षित टिझरमध्ये कमल हासनची एक जबरदस्त झलक पाहायला मिळत आहे. 'नायकन' या ब्लॉकबस्टर चित्रपटाच्या तब्बल ३५ वर्षानंतर कमल हासन आणि मणिरत्नम ही जोडी 'ठग लाईफ'मध्ये पहिल्यांदा एकत्र येणार असल्यामुळे या चित्रपटाकडे जगातील तमाम कमल हासन प्रेमी रसिकांचं लक्ष आहे.

'ठग लाईफ' या चित्रपटाच्या निर्मितीची घोषणा राज कमल फिल्म्स इंटरनॅशनल आणि मद्रास टॉकीजने गेल्या वर्षी केली होती. त्यानंतर या चित्रपटाचं शूटिंग सुरू झालं होतं. काही दिवसापूर्वी याचं शूटिंग पूर्ण झाल्यानंतर मणिरत्नम यांनी एक व्हिडिओही शेअर केला होता. त्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता पराकोटीला गेली आहे. कमल हासन आमि मणिरत्नम यांच्या आजवरच्या लौकिकाला शोभेल असाच 'ठग लाईफ'चा टिझर आहे. यामध्ये कमल हासन पुन्हा एकदा एका चाणाक्ष, शक्तीमान ठगाच्या भूमिकेत दिसत आहे. यातील दृष्ये डोळ्यात साठवून ठेवावीत अशीच आहेत. वेगवान ॲक्शन, साहसी दृष्ये आणि नेत्रदीपक सेट यांचा नजारा या झलकमध्ये पाहायला मिळत आहे.

### प्रवीण महाजनांच्या पत्नीचा धनंजय मुंडे, पंकजा मुंडेंवर गंभीर आरोप, म्हणाल्या, भावा-बहिणीने आमची जमीन हडपली

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : दिवंगत नेते प्रवीण महाजन यांची पत्नी सारंगी महाजन यांनी धनंजय मुंडे यांच्यासह पंकजा मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. दोन्ही मुंडे बहीण भावाने संगनमताने धाक दाखवून आणि कारस्थान रचून जबरदस्तीने कोट्यवधी रुपयांची जमीन अल्प किमतीत खरेदी केली असल्याचा आरोप सारंगी महाजन यांनी केला. प्रवीण महाजन यांच्या नावे असलेली बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यामधील मौजे जिरेवाडी येथील गट नंबर २४० मधील करोडो रुपये किम तीची ३६.५० आर जमीन धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी जबरदस्तीने घेतली असल्याच त्यांनी म्हटले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत त्यांनी हे आरोप केले आहेत. सारंगी महाजन यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. यावर आता धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे काय उत्तर देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.



परळीत माझी ६३.५० आर जमीन होती, ३६ आर जमीन फ्रॉड करुन विकली. मला परळीच्या अनुसूया हॉटेलमध्ये बोलावून घेतले. मला तिथून रजिस्ट्रार ऑफिसला नेले. तिकडे माझ्याकडून सही करुन घेण्यात आली. कोणी जमीन घेतली, हे आम्हाला माहिती नाही. तिकडून आम्हाला गोविंद बालाजी मुंडेने घरी नेले, जेवू घातले. त्यानंतर ब्लँक पेपरवर सह्या घेतल्या. त्याला मी विरोध केला असता त्याने म्हटले की, सही केल्याशिवाय धनुभाऊ तुम्हाला परळी सोडून देणार नाहीत, अशी धमकी दिल्याचे सारंगी महाजन यांनी सांगितले. गोविंद बालाजी मुंडे याने आम्हाला ठाण्यातील घरी आणून सोडले. त्यानंतर आमच्याकडून त्याने एक लाख रुपये घेतले, असेही सारंगी महाजन यांनी सांगितले

धनंजय मुंडे हे परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. मराठवाड्यातील मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षामुळे परळी विधानसभेची लढाई अटीतटीची होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीच्या तोंडावर सारंगी महाजन यांनी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करत एकच खळबळ उडवून दिली आहे.

### काँग्रेसच्या शिष्टमंडळाची भाजपच्या खोट्या जाहिराती विरोधात मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे तक्रार

**मुंबई/प्रतिनिधी** : काँग्रेस सरकारने वेगवेगळ्या राज्यात खोट्या गॅरंटी दिल्या, त्या पूर्ण केल्या नाहीत अशी जाहिरात भाजपने केली आहे, हे खोटे आम्ही निवडणूक आयोगाच्या निर्दर्शनास आणून देत भाजपवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय काँग्रेसच्या माध्यम व प्रसिद्धी विभागाचे चेअरमन पवन खेरा व काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे या शिष्टमंडळाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

काँग्रेसने तक्रारीत नमूद केली आहे की, महत्त्वाच्या वृत्तपत्रांमध्ये भाजपने मतदारांना खोटी माहिती देण्याचे काम केले आहे. काँग्रेसने राज्यांत जी गॅरंटी दिली होती, त्याचे पालन केले जात नाही, असे आरोप जाहिरातीत केले आहेत. त्यामुळे भाजपवर तात्काळ कारवाई करावी, पुन्हा अशा जाहिराती प्रसिद्ध करू नये, काही जाहिरातींमध्ये प्रकाशकाचे नाव दिलेले नाही, त्यामुळे नियमाचे उल्लंघन करणाऱ्या भाजपवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने वतीने अखिल भारतीय काँग्रेसच्या माध्यम व प्रसिद्धी विभागाचे चेअरमन पवन खेरा व काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन लेखी निवेदन देऊन केली आहे. यावेळी अखिल भारतीय काँग्रेसच्या माध्यम व प्रसिद्धी विभागाचे चेअरमन पवन खेरा व काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांचे उपस्थिती होती.




#### असे आरोप करुन सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न

प्रत्येकवेळी काँग्रेस निवडणूक हरायला येते, तेव्हा असे रिपोर्ट व आरोप केले जातात.सनसनाटी उडवून सहानुभूती मिळवण्याचा हा प्रयत्न आहे.गेल्यावेळी पंतप्रधानांना मारण्याचा डाव बोलले पण तो प्लांटेड मेल होता. ते करणार असल्याने असे स्टेटमेंट केले जात आहे.हे षडयंत्र जनतेच्या लक्षात आले आहे. अशी टीका उपमुख्यमंत्री तथा भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर केली आहे.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; दोन दिवसात ४ लक्ष ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत अवैध मद्यनिर्मिती, वाहतुक व विक्री मोठ्या प्रमाणात होत असून अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत दोन दिवसात अवैध मद्यनिर्मिती व विक्री प्रकरणी ४ लक्ष ६१ हजार ८५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे.

जिल्ह्यात कार्यरत विविध अनुज्ञप्त्यांच्या व्यवहारावर देखरेख तसेच नियंत्रणासाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत केली असून मध्यप्रदेश राज्याच्या सिमावर्ती भागात तपासणी नाके उभारण्यात आले आहे. तसेच नाक्यावर परराज्यातून येणाऱ्या अवैध मद्य वाहतुकीवर अंकुश ठेवण्यात येत आहे. यासाठी चार निरीक्षकांच्या नियंत्रणाखाली चार पथकांची नेमणुक केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. ५ व ६ नोव्हेंबर २०२४ रोजी आचारसंहिता कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील हातभट्टी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे घालुन २४ गुन्हे नोंदविले असुन २५ आरोपींना अटक केली आहे. सदर गुन्ह्यात एकुण २ वाहने जप्त केली असुन एकुण ४ लक्ष ६१ हजार ८५ रुपये एवढा मुद्येमाल जप्त केलेला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात कोरडे दिवस पाळण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसार दि. १८ नोव्हेंबरचे सायंकाळी ५ वाजेपासुन ते २० नोव्हेंबरपर्यंत जिल्ह्यातील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद राहतील. तसेच दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस जाहीर करण्यात आलेला आहे. मध्यप्रदेश राज्याच्या सिमावर्ती भागात सुद्धा कोरडा दिवस जाहीर करण्याबाबत बुरहानपुरचे(मध्यप्रदेश) जिल्हाधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात रात्री गस्त घालुन खाजगी वाहने, ट्रॅव्हल्स इत्यादी मधुन अवैध मद्य वाहतुक होऊ नये याकरिता कसुन तपासणी करण्यात येत आहे. सिमावर्ती जिल्ह्याच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून मध्यप्रदेश अबकारी विभागासोबत संयुक्त मोहिम राबविण्यात येत आहे. अवैध मद्य विक्रेते, वाहतुक व विक्री करणाऱ्यावर तसेच हॉटेल्स, ढाब्यांची तपासणी करुन ढाबा चालक, मालकांसह त्याठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. अनियमीतता आढळून येणाऱ्या परवानाधारक मद्यविक्री दुकानदारांवरही कारवाई सुरु आहे. नागरीकांनी अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स ढाब्यावर जाऊन मद्य सेवन करु नये, असे आवाहन करण्यात येत आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसॲप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.

विविध वृत्त...

## महाराष्ट्राच्या जनतेला परिवर्तन हवं आहे शरद पवार यांचे प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी** : निवडणूक जाहीर झाली आहे,आमच्या प्रचाराची सुरुवात छान झाली आहे.राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मी आणि या शिवाय सर्वांच्या उपस्थितीत दि.६ नोव्हेंबर रोजी या प्रचाराची विधिवत सुरुवात केली असून महाराष्ट्रातल्या जनतेला परिवर्तन हवे आहे अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी प्रचाराच्या प्रारंभ दरम्यान प्रसारमाध्यमांना दिली. शरद पवार यावेळी म्हणाले की मी नागपूरला आलो आहे आणि तीन सभा घेऊन या नंतर हिंगणघाट या भागात जाणार आहे, दि.१८ नोव्हेंबरपर्यंत माझा दौरा आहे.मला विश्र्वास आहे महाराष्ट्रातील जनतेला बदल, परिवर्तन पाहिजे त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम आम्हाला करावे लागेल या दृष्टीने आजपासून सभा आणि प्रचाराचा नियोजन केले आहे. मुख्यमंत्री व तावडे यांच्या वक्तव्याबाबत बोलताना त्यांची अंतर्गत माहिती आहे, त्यांना जास्त माहिती असणार,तर राहुल गांधी यांच्या आरक्षणा च्या भूमिके विषयी मत व्यक्त करताना मी माझ्या पक्षाची भूमिका सांगतो, जातीय जनगणना व्हावी याची मागणी मी ३ वर्षांपासून करतो,ती झालीच पाहिजे, त्यातून वास्तव समोर येईल आणि ते आल्यानंतर आज ची आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासाठीची स्थिती दिसून येईल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

## अतिशय गलिच्छ! मूल होत नसल्यामुळे पती आणि मांत्रिकासह तिघांकडून सामूहिक बलात्कार

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : जादू–टोणा, तांत्रिक अशा गोष्टी अंधश्रद्धा असल्या तरीही अजूनही राज्यात अनेक जण याचे बळी पडतात. अशीच एक मन हेलावून टाकणारी घटना सांगली जिल्ह्यात घडल्याचे समोर आले आहे. महिलेला मूल होत नसल्यामुळे तिचे सासरचे कुटुंब अंधश्रद्धेचे बळी पडले. इतकेच नव्हे तर तिच्यावर सामूहिक बलात्कार देखील करण्यात आला. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यामधील एका विवाहित महिलेच्या तिच्याच सासरच्या व्यक्तींनी शारीरित आणि मानसिक छळ केल्याचे समोर आले आहे. या महिलेला मूल होत नसल्यामुळे सासरचे कुटुंब अंधश्रद्धेच्या आहारी गेलं. त्यामुळे घरात सतत मांत्रिकाला बोलवलं जात होतं. यावेळी महिलेला मांत्रिकाचे पाय धुवून ते पाणी प्यायला सांगितले होते. असा गलिच्छ प्रकार विश्रामबागेतील घरी तसेच अर्जुनवाडमधील मंदिरात सुरू होता.

दरम्यान, काही काळापूर्वी या तरूणीचे संपूर्ण सासरचं कुटुंब गाडीतून निघाले असता वाटेत त्यांची गाडी बंद पडली. यावेळी सासरच्या मंडळींनी अर्जुनवाडमधील बुवा काशिनाथ उगारे याला फोन केला. यावेळी या कथित बाबाला संपूर्ण हकीकत सांगण्यात आली. त्यावेळी मांत्रिकाने पीडितेच्या कुटुंबीयांना ती महिला अपशकुनी असून तिचे शुद्धीकरण करावे लागेल, असे सांगितले. तिच्यावर शुद्धीकरणाच्या नावाखाली पती, दीर आणि मांत्रिकाने अर्जुनवाड याठिकाणी सामूहिक बलात्कार केला.

या संपूर्ण प्रकारानंतर पीडित महिलेची खराब अवस्था पाहून माहेरच्यांनी विचारपूस केली. त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला. यानंतर पीडितेने विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार पती, दीर, सासू, सासरे आणि मांत्रिकाविरुद्ध गुन्हा दाखल बेड्या ठोकल्या आहेत.

## बंडखोरांना काँग्रेसचा दणका, जिचकारांच्या मुलाला थेट बाहेरचा रस्ता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरु झाली आहे. राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक पार पडणार असून २० नोव्हेंबरला मतम ोजणी होणार आहे. तर २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. काही दिवसांपूर्वी भाजपने बंडखोरी करणाऱ्या अनेक नेत्यांची हकालपट्टी केली होती. तर काँग्रेसमध्ये अनेक नेत्यांनी बंडखोरी इल्याचे दिसून आले आहे. आता बंडखोरांविरोधात काँग्रेसने कारवाईचा बडगा उगारला आहे.

ज्या कांग्रेसच्या उमेदवारांनी बंडखोरी केली आहे. त्यांना ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिली आहे. यात रामटेक विधानसभा मतदारसंघातून राजेंद्र मुळक, काटोलमधून काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार, पर्वती विधानसभा मतदारसंघातून आबा बागुल आणि कसबा विधानसभा मतदारसंघातून कमल व्यवहारे यांना ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे.

जयश्री पाटलांवरही कारवाई

तर सांगली विधानसभेसाठी काँग्रेसने पृथ्वीराज पाटील यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या वसंतदादा गटाने जयश्री पाटील यांना अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं. त्याला आता खासदार विशाल पाटील यांनी जाहीर पाठिंबा दिला. आता जयश्री पाटील यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. जयश्री पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे.

काय म्हणाले रमेश चेन्निथला?

काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांनी म्हटलंय की, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाच गॅरंटी आम्ही काल जाहीर केल्या आहेत. भारताचं भविष्य उज्वल करण्यासाठी या गॅरंटी महत्त्वाच्या आहेत. १३,१६ आणि १७ नोव्हेंबरला प्रियंका गांधी महाराष्ट्रात येत आहेत. मल्लिकार्जुन खरगे पाच दिवस महाराष्ट्रात प्रचार करणार आहेत. ज्या कांग्रेसच्या उमेदवारांनी बंडखोरी केली आहे त्यांना ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आलं आहे. आम्ही गॅरंटी दिलेल्या आहेत.


# मद्यधुंद ट्रकचालकाचा तब्बल १६ किलोमीटर महामार्गावर थरार

## वेगवेगळ्या वाहनांना धडक घेतला एकाच बळी

## सिने स्टाईल ट्रक थांबवावा लागला मद्यधुंद चालकाचा ट्रक

दैनिक आपला विदर्भ







**डोणगाव/प्रतिनिधी** : मद्यपान करून तराड झालेल्या ट्रक चालकाने तब्बल १६ किलोमीटर अंगावर शहारे आणणारा प्रवास करत चार ते पाच वाहनांना जबर धडक दिली या धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला तर चार ते पाच जण सुदैवाने या अंगावर शहारे आणणाऱ्या अपघातातून वाचले. हा भीषण प्रकार मेहकर बायपास पासून तर डोणगाव पोलीस स्टेशन येईपर्यंत अनेकांनी पाहून सुटकेचा निः श्वास सोडला.

घटनेबाबत प्राप्त माहिती नुसार मद्यधुंद ट्रक चालक एमएच ३४ बीजी ६८९५ या क्रमांकाचा ट्रक घेऊन छत्रपती संभाजीनगर कडून नागपूरच्या दिशेने जात होता. या ट्रक चालकांनी प्रचंड प्रमाणात मद्यपान केल्याने त्याचे स्वतःवरील नियंत्रण सुटले. मद्यधुंद ट्रक चालकाने मेहकर बायपास पासून तर डोणगाव पोलीस स्टेशन पर्यंत १६ किलोमीटरच्या प्रवासात तब्बल चार ते पाच वाहनांना जबर धडक दिली. या धडकेत मेहकर कडून डोणगाव कडे जात असणाऱ्या आरेगाव येथील मोटरसायकल स्वार जागीच ठार झाला. सुरुवातीला खंडाळा जवळ मेहकर बायपास येथे एका स्विफ्ट डिझायर गाडीला त्या मद्यधुंद ट्रक चालकाने धडक दिल्याची प्राथमिक माहिती या धडकेत डिझायर मधील प्रवाशांना किरकोळ जखमी झाले. तेथून त्या ट्रक चालकाने पळ काढत असताना रस्त्यात जागोजागी काही मोटरसायकल स्वरांना धडक देण्याचा प्रयत्न केला. मेहकरकडून डोणगाव कडे जाणाऱ्या भोसले मोटरसायकल क्र. एम एच २० बि के ६१६३ धडक दिली. या धडकेत मोटरसायकल स्वरांचा जागीच मृत्यू झाला. तसेच दिलीप भोसले वय ३७ हे पेट्रोल आणण्यासाठी जात असताना त्यांना जवळ धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले.तसेच या धडकेत आरेगाव व नेतंसा येथील पाच ते सहा व्यक्ती जखमी झाले. ट्रक चालकांने तेथून पळ काढत असताना डोणगाव पोलिसांना याबाबत माहिती मिळाली. नंतर डोणगाव पोलिसांनी डोणगाव पोलीस स्टेशन समोर ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी वाहतूक थांबवली असता, मद्यधुंद चालकाने समोर उभ्या असलेल्या ट्रकला जबर धडक दिली, समोर मोठा ट्रक असल्याने सदर मद्यधुंद वाहन चालक हा पोलिसांच्या हाती लागला. पीएसआय संदीप सावले यांनी मध्यधुंद ट्रक चालकाला ताब्यात घेऊन अपघात झालेल्याना यांना मेहकर येथे ग्रामीण रुग्णालयात पाठवले.

तब्बल १६ किलोमीटर अंगावर शहारे आणणाऱ्या या ट्रक चालकाच्या या मद्यधुंद प्रवासाने अनेकांचा जीव हा मृत्यूच्या दाढीतून बाहेर आला. तर सदर ट्रक चालकाच्या प्रवास पाहिल्याने अंगावर शहारे येत प्रवाशांचा जीव भांड्यात पडला.

### डोणगाव पोलिसांचे कौतुक

मद्यधुंद ट्रक चालकाने भरधाव वेगाने ट्रक चालवून चार ते पाच वाहनांना उडविले, यामध्ये एकाचा जीव गेला. तर अनेक जण जखमी झाले.या घटनेची माहिती डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांना मिळताच त्यांनी सिनेस्टाईल डोणगाव पोलीस स्टेशन समोर एक मोठा ट्रक थांबवला व वाहतूक थांबवली. त्यानंतरही सदर मद्यधुंद ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन न थांबवता समोर उभ्या असलेल्या ट्रकला जबर धडक दिली.त्यामुळे पुढील अनर्थ टळला, पोलिसांच्या या धाडसी कार्याबद्दल डोणगाव पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे...

# चिखली विधानसभा मतदारसंघात पाच मतदान केंद्राची वाढ; आता ३१७ मतदान केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूकीत मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारसंघात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २३– चिखली विधानसभा मतदारसंघात पाच नवीन मतदार केंद्राची निर्मिती करण्यात आली असून आता चिखली मतदारसंघात ३१७ मतदान केंद्र झाले आहेत.

मतदान केंद्राच्या रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी ज्या मतदान केंद्रांवर मर्यादेपेक्षा जास्त मतदार आहेत किंवा दोन गावातील मतदार एकाच मतदान केंद्रांना जोडण्यात आलेले होते, असे सर्व मतदान केंद्र मिळून जिल्ह्यात नव्याने २३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये चांधई, कोलारी, गिरोला व चिखली येथे मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे चिखली विधानसभा मतदारसंघात ३१७ मतदान केंद्र झाले असून शहरी भागात ५१ तर ग्रामिण भागात २६६ मतदान केंद्र आहेत. नवीन मतदान केंद्राच्या निर्मितीमुळे कुटुंबातील सर्व मतदारांची नावे एकाच मतदान केंद्रावर उपलब्ध होणार आहेत.

लोकसभेला जिल्ह्यात २ हजार २६५ मतदान केंद्रे होती. यात २३ नवीन मतदान केंद्रांची वाढ होऊन २ हजार २८८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. दि. १ जुलै २०२४ अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरणांतर्गत मतदान केंद्रात वाढ करण्यात आली आहे.

मतदारसंघात पाच नवीन मतदार केंद्राची वाढ

१. चांधई येथील मतदारांना ४१–धोडप येथील मतदान केंद्रावर जाण्यासाठी दोन कि.पेक्षा जास्त अंतर जावे लागत असल्याने ४२–चांधई जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

२. कोलारी गावातील मतदारांना ४३–ब्रम्हपूरी येथील मतदान केंद्रावर जाण्यासाठी दोन कि.पेक्षा जास्त अंतर जावे लागत असल्याने ४५–कोलारी जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

३. गिरोला गावातील मतदारांना ८३– हातनी येथील मतदान केंद्रावर जाण्यासाठी दोन कि.पेक्षा जास्त अंतर जावे लागत असल्याने ८६–गिरोला येथील मतदारांचे गैरसोय टाळण्यासाठी जिल्हा परिषद मराठी पुर्व माध्यमिक शाळा, गिरोली येथे नविन मतदान केंद्र तयार करण्यात आले.

४. १८४–चिखली नगर परिषद मराठी प्राथमिक शाळा मतदान केंद्रावर १ हजार ४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे १८८–नगर परिषद व्यायाम शाळा गांधीनगर चिखली येथे मतदान केंद्र तयार करण्यात आले.

५. १९४– चिखली जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा मतदान केंद्रावर १ हजार ४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे मतदान केंद्र क्रमांक १९९–चिखली औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील खोली क्रमांक २ येथे मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.

प्रथमच मतदानाचा हक्क बजावणार ७ हजार ४९९ नवमतदार

२३–चिखली मतदारसंघात ३ लक्ष ५ हजार ७१८ मतदार असून त्यामध्ये १ लक्ष ५७ हजार १७० पुरुष तर १ लक्ष ४८ हजार ५४६ महिला व २ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५पेक्षा जास्त वयोमान असलेले मतदार ५ हजार ६३२ असून २ हजार ८५ पुरुष तर ३ हजार ५४७ महिला मतदार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रथमच मतदानाचा हक्क बजावणारे ७ हजार ४९९ नवमतदार असून ४ हजार ८८५ पुरुष तर २ हजार ६१४ महिला नवमतदार आहेत.

मतदान यादीत नाव असल्याची मतदारांनी खात्री करावी– जिल्हाधिकारी

भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदार केंद्र जाणून घेण्यासाठी व्होटर हेल्पलाईन प किंवा ीींशीी.शलळ.सीीं. ळप या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच मतदार नोंदणी किंवा मतदान केंद्राची माहिती शोधण्याच्या बाबतीत काही मदत हवी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा चिखली मतदारसंघासाठी हेल्प लाईन क्रमांक १८००२३३६३६३ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## ऋषभ पंतची मोठी झेप! खउउ टेस्ट रँकींगमध्ये मिळाले सहावे स्थान

**मुंबई/प्रतिनिधी** : ताज्या आयसीसी कसोटी क्रमवारीत टीम इंडियाचे सुपरस्टार रोहित शर्मा आणि विराट कोहली टॉप–१० मधून बाहेर झाले आहेत. दरम्यान, ऋषभ पंतने चांगलीच झेप घेतल्याचे दिसून येत आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील भारताच्या दारूण पराभवानंतर आयसीसीने पुन्हा एकदा कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. दरम्यान, भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतला थोडा फायदा झाला आहे. तर यशस्वी जैस्वालला धक्का बसला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोन्ही स्टार खेळाडूंना मात्र तगडा फटका बसला आहे.

कोण आहे अव्वल स्थानावर?

आयसीसीने जाहीर केलेल्या कसोटी क्रमवारीत इंग्लंडचा जो रूट अजूनही अव्वल स्थानावर आहे. त्याचे रेटिंग ९०३ आहे. तर केन विल्यमसन दुसऱ्या क्रमांकावर असून त्याचे रेटिंग ८०४ आहे म्हणजेच पहिला आणि दुसऱ्या क्रमांकाचा फलंदाज यांच्यात फरक बराच मोठा आहे. यानंतर इंग्लंडच्या हॅरी ब्रूकला एका स्थानाचा

## संजय राऊत महाविकास आघाडीचे डुक्कर, कितीही साबण, शाम्पू लावला तरी ते घाणीत जातं; 'आमदार' सदाभाऊंचा 'लगाम' पुन्हा सुटला!

**मुंबई/प्रतिनिधी** : संजय राऊतला गावगाडा माहिती नाही, त्यामुळे राखण करणारा कुत्रा म्हणजे काही माहित नाही. पण तुम्ही २०१४ आणि २०१९ ला नरेंद्र मोदी यांचा फोटो गळ्यात अडकवून मतांचा जोगवा मागत गावोगावी फिरत होता, असा पलटवार आमदार सदाभाऊ खोत यांनी (एर्र्रंप्रल खप्दू दह एरहररब ींरलू) केला आहे. शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेवर केलेल्या टीकेवर सदाभाऊ खोत यांच्यावर सडकून टीका होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही सदाभाऊ खोत यांना अत्यंत कडक शब्दात फटकारले आहे. चौफेर टीकेनंतर सदाभाऊ खोत यांनी नरमाईचे धोरण स्वीकारत दिलगिरी व्यक्त केली. मात्र, संजय राऊत यांनी थोबाडीत द्यायला हवी होती, अशी टीका करताच सदाभाऊंनी आता संजय राऊत यांची तुलना डुकराशी केली आहे.सदाभाऊ यांनी म्हटलं आहे की, २०१९ मध्येही तुम्ही भाषण करत होता. सत्तेत आल्यावर तुम्ही पहिला खंजीर हातात घेतला. तुमच्यात इमानदारपणा आहे का शोधा आणि कुर्त्याएवढा जरी इमानदारपणा असता तर महाराष्ट्रान तुमचं कौतुक केलं असतं. तरीही मला त्याच्यावर जास्त काही बोलायचं नाही कारण डुकराला कितीही साबण शांपू लावला तरी डुक्कर गटारातच जातं, अशी टीका सदाभाऊ खोत यांनी संजय राऊत यांच्यावर केली.

# पाच वर्षांपुर्वी तुम्ही चुकीचा माणुस निवडला

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आमदार नितीन देशमुखांना टोला

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात दोन वर्षांपासून महायुतीचा विकासाचा अजेंडा घेऊन प्रचंड वेगाने विकास कामे केली जात आहे.दोन वर्षांपूर्वी मी उठाव केला अन नवीन सरकार आणलं मैने एक बार कमिटमेंट किया की मै खुद का भी नही सुनता, अशी डायलॉगबाजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळापूर वाडेगाव येथे दि.७ नोव्हेंबर रोजी आयोजित प्रचार सभेत केली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, २०१९ मध्ये सरकारला बहूमत मिळाल्यानंतर विश्र्वासघात केला म्हणून उठाव केला. शिवसेना चोरली असं लहान मुलासारखं म्हणता, मग मी शिवसेना चोरतांना तुम्ही झोपले होते का? सत्ता सोडून आम्ही बाहेर पडलो, जिथे बुक्यांचा मार सहन करावा लागला तिथे थांबणे तुम्हाला मान्य आहे, का असा प्रश्न जनतेला केला.ज्या उबाठाने आमचा धनुष्यबाण गहाण ठेवला होता तो आम्ही सोडवून आणला आहे. आम्ही केलेले काम



तुमच्यासमोर आहेत. तर यांनी सर्व कामात खोडा घातला आहे. उद्योग पळवले म्हणता, आज पाहाल महाराष्ट्र एकवर आहे. मोठी गुंतवणूक राज्यात आहे.ते लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी कोर्टात गेले, पण कोर्टानं त्यांच्या थोबाडीत मारली आहे. लाडकी बहीणीच दु:ख त्यांना काय माहिती, आणि ते म्हणतात आमचं सरकार आलं की सर्व योजनांची चौकशी लावू, या पोकळ धमक्यांना एकनाथ शिंदे घाबरत नाही, लाडक्या बहिणीसाठी एकनाथ शिंदे जेलमध्ये जायला तयार आहे. आम्हाला माहीत होतं आचारसहिता लागली की काळ मांजर आडवा घालणार, म्हणून ऑक्टोबर मध्येच नोव्हेंबर चा हप्ता देऊन टाकला आहे.आम्ही लाडक्या बहिणीच्या खात्यात हप्ता भरणार आमचे सरकार आहे. मात्र, पूर्वीच सरकार हप्ते घेणारं होते.आता राहुल गांधी आले आणि म्हणतात ३ हजार रुपये देणार, राजस्थान, हिमाचल आणि कर्नाटकमध्ये तुम्ही फसवले आहे. तुम्ही देणार म्हणता, आणि आम्ही देऊ लागलो, लाडक्या बहिणींना बघून, ते येडे झाले त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. लाडक्या बहिनींना लखपती झालेला बघायचा आहे, हेच आमच स्वप्न आहे.८० कोटी जनतेला मोफत राशन देण्याचा निर्णय घेतला आहे.महाराष्ट्रात हनुमान चालीसा वाचली तर तुम्ही तुरुगांत टाकता, कालचा जाहीर केलेला वचननामा हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर बाकी आहे. असे म्हणून त्यांनी टाळ्याची वाहवा मिळवली. शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी करणार आहोत,

वृद्ध पेन्शन योजना पंधराशे वरून २१०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आणि तुम्ही अडीच वर्ष तुमचे हात बांधले होते का? तुम्हाला कोणी थांबवलं होतं असं म्हणत उद्धव ठाकरेंना टोला लगावला. घरात बसून सरकार चालत नाही, तेव्हा घरात बसले होते, आता त्यांना कायमचे घरात बसवा, असे आव्हान उपस्थित जनसमुदायाला केले.ज्यांनी लाडक्या बहीण योजनेला विरोध केला, त्या सावत्र भावांना जागा दाखवा.असे आवाहन लाडक्या बहिणींना केले.तर मंचावर उपस्थित भाजपचे माजी आमदार नारायण गव्हाणकर इच्छुक होते. परंतु त्यांच्यावर आपलं लक्ष असणार असून एकनाथ शिंदे काल आज आणि उद्याही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार आहे.सीएम म्हणजे कॉमन मॅनचं असून सर्वसामान्यांचे सरकार आणि सर्वसामान्यांचा मुख्यमंत्री आहे. तर महाविकास आघाडीत मुख्यमंत्री कोण? हा मुद्दा आता दिल्लीच्या आखाड्यात टाकल्या जात आहे. अशी टीका महाविकास आघाडीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.